# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 50 ) 1st June 2025 ( No. of Pages 04 ) ( No : 09


## सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्याग्रस्त अमरावती विभागातील जिल्ह्यांचा सिंचन अनुशेष कमी झाला नसून तो मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे

## त्यातील काही जिल्ह्यांचा अनुशेष संपुष्टात आलेला आहे ही केवळ अफवा


**- प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


**१.** सिंचन अनुशेषाने त्रस्त व शेतकरी आत्महत्याग्रस्त अमरावती महसूल विभागातील काही जिल्ह्यांचा सिंचन अनुशेष पूर्णपणे संपुष्टात आलेला आहे अशी एक जोरदार अफवा पसरली असून महाराष्ट्र शासनातील काही उच्च पदस्थ अधिकारी ही अफवा पसरविण्यात पुढाकार घेत असल्याचे दिसून येते. अमरावती व वाशिम जिल्ह्याचा अनुशेष पूर्णपणे संपुष्टात आलेला आहे अशी एक उपअफवा त्यांत अंतर्भूत आहे. जून २०२० च्या स्तरावर निर्मित जिल्हावार सिंचन क्षमतेची अधिकृत आकडेवारी आता उपलब्ध झाली असून या आकडेवारीप्रमाणे ही अफवा पसरविणे म्हणजे वस्तुस्थितीवर पांघरुण घालणे होय. ही अधिकृत आकडेवारी कशी उपलब्ध झाली? याविषयीची प्रथम माहिती करून घेऊ.

**२.** सन २००३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १९ (महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयक २००३) हे दिनांक १७ डिसेंबर २००३ रोजी विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आले होते. या विधेयकामध्ये घटनेतील कलम ३७१ (२) चा उल्लेख नव्हता, मा.राष्ट्रपतीच्या ९ मार्च १९९४ च्या आदेशाचा उल्लेख नव्हता, मा. राज्यपालांच्या निदेशांचा उल्लेख नव्हता, त्यामुळेच सिंचन अनुशेषग्रस्त भागातील आम्हा लोकप्रतिनिधींचा त्या विधेयकाला विरोध होता. तसेच्या तसे विधेयक मांडले गेल्यास आम्ही त्याला विरोध करू अशी भूमिका आम्ही काही सदस्यांनी घेतली. ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे म्हणजे त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या करून ते सभागृहापुढे आणता येईल असे आमचे म्हणणे होते. १९ डिसेंबर २००३ रोजी हे विधेयक सभागृहासमोर आले असता व्यक्तीशः मी तसा ठरावच सभागृहामध्ये मांडला. **सभागृहामध्ये हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**३.** त्यादिवशी या संदर्भात सभागृहामध्ये झालेल्या कार्यवाहीचे शब्दशः अधिकृत प्रतिवेदन पुढीलप्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २००३ चे वि.प.वि.क्र. १९ - महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जल संपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्याची सुनिश्चिती करण्याकरिता कृषिविषयक, औद्योगिक पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विधानसभेची संमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त तीन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठवावे, असा प्रस्ताव मांडतो.

**श्री.बाळासाहेब थोरात (पाटबंधारे राज्यमंत्री)** : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी विनंती केल्यानुसार सन २००३ चे वि.प.वि.क्र. १९ दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव मी मान्य करतो.

**उप सभापती** : ठीक आहे. मी आता प्रस्ताव मतास टाकतो.

**प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.**"

*(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर २००३ : खंड १३३, क्रमांक १०, पृष्ठ ८)*

**४.** उभय सभागृहांच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक गेले. त्या समितीवर एक सदस्य म्हणून विधानपरिषदेने माझी नेमणूक केली होती. आता नुसती टीका करण्याचा प्रश्न नव्हता, तर योग्य त्या सुधारणा सुचविण्याची जबाबदारी आमच्याकडे आली होती. **सदस्य या नात्याने अनुशेषग्रस्त भागाला न्याय देणाऱ्या अनेक सुधारणा आम्ही मांडल्या व त्यातील बहुतेक मान्य होऊन कायद्याचा भाग बनल्या.** अनुशेषग्रस्त भागाला दिलासा देणारी प्रा.बी.टी.देशमुख यांनी मांडलेली एक महत्त्वपूर्ण सुधारणा, जी आता कायद्याचा (कलम २० (१) (ख) म्हणून) भाग बनली आहे ती शब्दशः पुढील प्रमाणे होती. :-

प्राधिकरणाच्या "अशा वार्षिक अहवालामध्ये जिल्हा घटक धरून प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये निश्चित झालेल्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये **प्रत्येक जिल्ह्याचा मोजण्यात आलेला अनुशेष,** जिल्हा पेरणीखालील क्षेत्र, प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये राज्यस्तरीय व स्थानिक प्रकल्पातून निर्माण झालेली एकूण सिंचन क्षमता, पेरणीखालील क्षेत्राशी सिंचन क्षमतेची टक्केवारी, राज्य सरासरीपेक्षा कमी असलेली टक्केवारी, हेक्टरात अनुशेष, या सूत्राप्रमाणे व पद्धतीने अद्यावत माहिती उपलब्ध असलेला अलीकडील वर्षाच्या व त्यानंतर **दरवर्षीच्या महाराष्ट्राच्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये निश्चित झालेला हेक्टरात (भौतिक) व अद्यावत दरसूचीप्रमाणे रुपयात (आर्थिक) दाखविलेला अनुशेष नमूद असलेले एक परिशिष्ट विहित केल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल."**

**५.** प्रा.बी.टी.देशमुख यांनी मांडलेली उपरोक्त सुधारणा प्रथम संयुक्त चिकित्सा समितीमध्ये व त्यानंतर उभय सभागृहामध्ये एकमताने मान्य करण्यात आली. या समितीसमोर मी केलेले आग्रही प्रतिपादन काय होते? हे मी येथे थोडक्यात नमूद करू इच्छितो. "एक प्रकार म्हणजे विकसित जिल्ह्यांत वेगाने दरवर्षी सिंचनक्षमता उपलब्ध होते, दुसरा प्रकार म्हणजे अविकसित जिल्ह्यात थोडीथोडी कां होईना पण सिंचन क्षमता दरवर्षी उपलब्ध होते. या दोनही प्रकारामध्ये **राज्यसरासरी दरवर्षी वाढत जाते व त्याप्रमाणात अनुशेष जिल्ह्यांचे राज्यसरासरीवर येण्याचे अंतर वाढत जाते,** म्हणजे अनुशेष वाढत जातो, पण अनुशेष वाढीचे हे वार्षिक चित्र अनुशेषग्रस्त भागातील लोकांना दरवर्षी पहायला सुद्धा मिळत नाही."

खुद्द विधानमंडळ सदस्यांना सुद्धा अतारांकित प्रश्न किंवा एखाद्या समितीच्या मार्फत अशी माहिती मिळवावी लागत असे. जून १९८२ ची राज्यसरासरी सत्यशोधन समितीच्या अहवालामुळे आम्हाला कळली. जून १९९० ची राज्य सरासरी विधानमंडळ सदस्य या नात्याने उपलब्ध झालेल्या अधिकारांचा वापर करून अतारांकित प्रश्नामार्फत मिळवावी लागली. सन १९९२ मध्ये आमच्या संघटनेने नुटा बुलेटीनचा **जलसिंचन अनुशेष विशेषांक** काढून ती प्रकाशित करण्यात आली होती. त्यानंतर जून १९९४ ची सरासरी अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाने उपलब्ध करून दिली होती व त्या माहितीचा समावेश असलेले "**महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष क्ष किरण परीक्षा**" या नावाने एक स्वलिखित पुस्तक आमच्या संघटनेने - 'नुटा'ने १९९८ मध्ये प्रकाशित केले होते. श्री.मनोहर पिंपळापूरे त्याचे प्रकाशक होते.

**६.** कायद्यातील या तरतुदीमध्ये असलेले "**दरवर्षीच्या महाराष्ट्राच्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये निश्चित झालेला हेक्टरात (भौतिक) व अद्यावत दरसूचीप्रमाणे रुपयात (आर्थिक) दाखविलेला अनुशेष नमूद असलेले एक परिशिष्ट विहित केल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल.**" हे शब्द महत्त्वाचे आहेत. शासनातील अनेक वरिष्ठ अधिकारी दरवर्षीच्या सरासरीवरील हा अनुशेष हेक्टरात व रुपयात अद्ययावत करावयाचा आहे याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात.

**७.** आज प्राधिकरण कायद्याच्या कलम २० (१) (ख) मध्ये ही उपरोक्त

# जोडपत्र : २ (३)

**(संदर्भ - परि. २.४.६) : महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण : वार्षिक अहवाल २०२०-२१**

## राज्य सरासरी ६७.७९ टक्केनुसार जून २०२० पर्यंत निर्मित क्षमते प्रमाणे जिल्हानिहाय अनुशेष

**सदर जोडपत्र हे मजनिप्रा अधिनियमाच्या कलम २० (१) (ख) अन्वये दिले आहे.** मा.राज्यपाल यांच्या निर्देशानुसार सध्या वर्ष १९९४ च्या राज्य सरासरीवर म्हणजेच ३५.११% यावर (६५.५९% या अलीकडील वर्षाच्या म्हणजेच जून-२०२० अखेरच्या राज्य सरासरीवर नव्हे) आधारित अनुशेष दूर करण्याचे नियोजन आहे.

**(क्षेत्र हजार हेक्टर आणि रक्कम रुपये कोटी)**

| अ. नं. | जिल्हा | निव्वळ पेरणी क्षेत्र | जुन २०२० पर्यंत निर्मित क्षमता राज्य रब्बी समतुल्यमध्ये (रा.र.स.) | | | रकाना ३ नुसार निर्मित क्षमतेची टक्केवारी | सिंचन अनुशेष रा.र.स. | अनुशेषाची रक्कम २,०२,८८६ प्रती हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ (४+५) | ७ | ८ | ९ |
| १ | मुबई | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| २ | मुंबई उपनगरे | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ३ | ठाणे | १४८.४३ | ६७.४३७ | १३.३९९ | ८०.८३६ | ५४.४६ | १६.५२ | ३३५.१६७ |
| ४ | पालघर | १४१.३७ | १०७.४७४ | ११.२०५ | ११८.६७९ | ८३.९५ | निरंक | .. |
| ५ | रायगड | १८८.६० | ८८.८९२ | १३.७४७ | १०२.६३९ | ५४.४२ | २१.०७ | ४२७.४८० |
| ६ | रत्नागिरी | २४७.०० | १०१.३०८ | १२.०२४ | ११३.३३२ | ४५.८८ | ४८.६८ | ९८७.६४९ |
| ७ | सिंधुदुर्ग | १५३.०० | ६८.०२४ | १८.००७ | ८६.०३१ | ५६.२३ | १४.३३ | २९०.७३५ |
| **कोकण विभाग** | | **८७८.४०** | **४३३.१३४** | **६८.३८२** | **५०१.५१६** | **५७.०९** | **१००.५९** | **२०४१.०३३** |
| ८ | नाशिक | ८९६.८० | ३९५.००९ | ११९.९७९ | ५१४.९८८ | ५७.४३ | ७३.२५ | १४८६.१३९ |
| ९ | धुळे | ४४६.८१ | १६५.३३० | ६८.८५९ | २३४.१८९ | ५२.४१ | ५८.८९ | ११९४.७९५ |
| १० | नंदूरबार | २८६.०९ | ११८.००१ | ४८.७२९ | १६६.७३० | ५८.२८ | २०.९३ | ४२४.६४० |
| ११ | जळगांव | ८५२.३० | ४६९.८७२ | ७०.३५५ | ५४०.२२७ | ६३.३८ | १८.८२ | ३८१.८३१ |
| १२ | अहमदनगर | ११७५.९० | ६५५.८१२ | १३७.१६७ | ७९२.९७९ | ६७.४४ | निरंक | .. |
| **नाशिक विभाग** | | **३६५७.९०** | **१८०४.०२३** | **४४५.०८९** | **२२४९.११२** | **६१.४९** | **१७१.८८** | **३४८७.४०७** |
| १३ | पुणे | ९८१.५० | ७४९.२७३ | १०४.६९३ | ८५३.९६६ | ८७.०१ | निरंक | .. |
| १४ | सातारा | ५८४.६० | ४६५.१७० | ९३.६७३ | ५५८.८४३ | ९५.५९ | निरंक | .. |
| १५ | सांगली | ५९२.८० | ७७३.८३१ | ५९.५५० | ८३३.३८१ | १४०.५८ | निरंक | .. |
| १६ | सोलापूर | १०८५.८० | ८७२.९४४ | १०२.०४४ | ९७४.९८८ | ८९.७९ | निरंक | .. |
| १७ | कोल्हापूर | ४१८.३० | ६३९.३१८ | १८.६८२ | ६५७.९९९ | १५७.३० | निरंक | .. |
| **पूणे विभाग** | | **३६६३.००** | **३५००.५३६** | **३७८.६४२** | **३८७९.१७७** | **१०५.९०** | **०.००** | **०** |
| **उर्वरित महाराष्ट्र** | | **८१९९.३०** | **५७३७.६९४** | **८९२.११३** | **६६२९.८०६** | **८०.८६** | **२७२.४८** | **५५२८.४४१** |
| १८ | औरंगाबाद | ७०२.०० | २३६.०७३ | १२५.८४४ | ३६१.९१७ | ५१.५६ | ९८.५४ | १९९९.२३८ |
| १९ | जालना | ६०९.२० | १७०.७०५ | ८३.३८२ | २५४.०८७ | ४१.७१ | १४५.५० | २९५१.९९१ |
| २० | परभणी | ५०२.६० | ४०२.९८५ | १६.०९३ | ४१९.०७८ | ८३.३८ | निरंक | .. |
| २१ | हिंगोली | ३४७.३० | १०१.०७० | १२.९४९ | ११४.०१९ | ३२.८३ | ११३.७८ | २३०८.४३६ |
| २२ | बीड | ८२८.६० | ३३२.३४२ | १२८.९०२ | ४६१.२४४ | ५५.६७ | ८२.२६ | १६६८.९४० |
| २३ | नांदेड | ७२८.३० | ३८७.३०० | ३७.१९४ | ४२४.४९४ | ५८.२९ | ५३.२२ | १०७९.७५९ |
| २४ | उस्मानाबाद | ५३६.१० | २२८.२३७ | ७४.४९३ | ३०२.७३० | ५६.४७ | ४८.९१ | ९९२.३१५ |
| २५ | लातुर | ५०१.८० | १९२.२३८ | ६२.१२४ | २५४.३६२ | ५०.६९ | ७४.७८ | १५१७.१८१ |
| **मराठवाडा विभाग** | | **४७५५.९०** | **२०५०.९५२** | **५४०.९८१** | **२५९१.९३३** | **५४.५०** | **६१७.०१** | **१२५१८.२६९** |
| २६ | बुलढाणा | ७०१.५० | १७०.३०६ | ३८.६०६ | २०८.९१२ | २९.७८ | २५१.२२ | ५०९६.९०२ |
| २७ | अकोला | ४३५.०० | ९७.६६४ | १२.९१४ | ११०.५७८ | २५.४२ | १७४.७५ | ३५४५.४३२ |
| २८ | वाशिम | ३९२.१० | १०६.९५० | २२.०३४ | १२८.९८४ | ३२.९० | १२८.२१ | २६०१.२०१ |
| २९ | अमरावती | ७५१.१० | १७४.९२६ | ३१.६६३ | २०६.५८९ | २७.५० | २८६.०८ | ५८०४.१६२ |
| ३० | यवतमाळ | ८५७.९० | ३०८.०४९ | ३३.२२३ | ३४१.२७२ | ३९.७८ | २२१.४५ | ४४९२.९१० |
| **अमरावती विभाग** | | **३१३७.६०** | **८५७.८९५** | **१३८.४४०** | **९९६.३३५** | **३१.७५** | **१०६१.७१** | **२१५४०.६०९** |
| ३१ | वर्धा | ३८१.०० | १८४.३७७ | १६.६६८ | २०१.०४५ | ५२.७७ | ४८.८६ | ९९१.३०० |
| ३२ | नागपूर | ५५४.०० | २५८.४७९ | ६१.१९३ | ३१९.६७२ | ५७.७० | ४३.७१ | ८८६.८१४ |
| ३३ | भंडारा | १८०.४९ | २९०.३५३ | ५७.२५६ | ३४७.६०९ | १९२.५९ | निरंक | .. |
| ३४ | गोंदीया | १९०.८१ | १५१.३९२ | ७७.७६४ | २२९.१५६ | १२०.१० | निरंक | .. |
| ३५ | चंद्रपूर | ४७४.४० | ३२६.६६६ | ८९.१९७ | ४१५.८६३ | ८७.६६ | निरंक | .. |
| ३६ | गडचिरोली | १८८.५० | ६३.७०१ | ५२.२७३ | ११५.९७४ | ६१.५२ | ७.६७ | १५५.६१३ |
| **नागपूर विभाग** | | **१९६९.२०** | **१२७४.९६९** | **३५४.३५१** | **१६२९.३२०** | **८२.७४** | **१००.२४** | **२०३३.७२९** |
| **विदर्भ** | | **५१०६.८०** | **२१३२.८६४** | **४९२.७९१** | **२६२५.६५५** | **५१.४१** | **११६१.९५** | **२३५७४.३३८** |
| **महाराष्ट्र राज्य** | | **१८०६२.००** | **९९२१.५०९** | **१९२५.८८५** | **११८४७.३९४** | **६५.५९** | **२०५१.४४** | **४१६८१.०५** |

**सिंचन अनुशेष (रकाना क्र. ८) = (६५.५९ - रकाना क्र.७) X निव्वळ पेरणी क्षेत्र / १००** सदर माहिती जलसंपदा विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.पीएलएन-२०२१/ प्रक्र-१३८/निवसं-१ दि. ८ डिसेंबर, २०२१ अन्वये प्राप्त झाली आहे.

तरतूद आल्यामुळे त्या प्राधिकरणाच्या दरवर्षीच्या अहवालामध्ये अनुशेषाचे हे दुर्दैवी चित्र निदान पहायला तरी मिळते. हे प्राधिकरण कायद्याने निर्माण केलेले आहे. त्यामुळे त्याला विधिमय अधिकृतता आहे. आणखी असे की दरवर्षी असा अहवाल तयार करणे हे प्राधिकरणावर कायद्याने बंधनकारक असून सादर झाल्यापासून सहा महिन्याच्या आत विधानमंडळाला सादर करणे शासनावर बंधनकारक आहे. **"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण : वार्षिक अहवाल २०२०-२१" हा आता उपलब्ध झाला असून त्याच्या जोडपत्र २ (३) मध्ये महाराष्ट्रामध्ये जून २०२० पर्यंत निर्मित सिंचनक्षमतेवर आधारित जलसिंचन अनुशेषाची आकडेवारी उपलब्ध झाली आहे. ते जोडपत्र जसेच्या तसे सोबत (याच अंकात पृष्ठ १३० वर) दिलेले आहे.** ही आकडेवारी पाटबंधारे विभागाने पाठविलेली आहे हे त्या जोडपत्रातच नमूद आहे.

## *सतत सिंचन अनुशेषात असलेले जिल्हे*

**८.** शेतकरी आत्महत्त्यांनी ग्रस्त असलेले अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ हे जिल्हे प्रत्येक मोजमापाच्या वेळी फार मोठ्या सिंचन अनुशेषात होते. तपशील पुढीलप्रमाणे :-

**(१) अमरावती जिल्हा** :- सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९८२) अमरावती जिल्ह्याचा अनुशेष १३४ हजार हेक्टरचा होता. तो अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९९४) २०९ हजार हेक्टरचा झाला. तो आता जून २०२० च्या राज्यसरासरीवर २८६.०८ हजार हेक्टरचा झाला आहे. या सर्व अहवालाप्रमाणे अमरावती हा क्रमांक एकचा सिंचन अनुशेषग्रस्त जिल्हा होता व आहे. तसेच अमरावती विभाग हा क्रमांक एकचा अनुशेषग्रस्त महसूली विभाग आहे.

**(२) अकोला (वाशिमसह) जिल्हा** :- सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९८२) अकोला जिल्ह्याचा अनुशेष ९२.३५ हजार हेक्टरचा होता. तो अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९९४ च्या स्तरावर) १८१ हजार हेक्टरचा झाला. जून २००९ च्या स्तरावर तो अकोला १४२.६१ व वाशिम १३१.६४ हजार हेक्टर म्हणजे एकत्रितरित्या २७४.२५ हजार हेक्टर झाला होता. आता जून २०२० च्या राज्यसरासरीवर तो वाशिम १२८.२१ हजार हेक्टर व अकोला १७४.७५ म्हणजे एकत्रितरित्या ३०२.९६ हजार हेक्टर एवढा झाला आहे. अर्थ असा की, मूळ अविभाजित अकोला जिल्ह्याचा २०२० मध्ये सिंचन अनुशेष ३०२.९६ हजार हेक्टरचा झाला आहे. त्यात २०२० च्या सरासरीवर वाशिम जिल्ह्याचा अनुशेष १२८.२१ हजार हेक्टरचा आहे.

**(३) बुलढाणा जिल्हा** :- सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९८२) बुलढाणा जिल्ह्याचा अनुशेष ८४.७८ हजार हेक्टरचा होता तो अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९९४ च्या स्तरावर) १६८ हजार हेक्टरचा झाला. आता तो जून २०२० च्या राज्यसरासरीवर २५१.२२ हजार हेक्टरचा झालेला आहे.

**(४) यवतमाळ जिल्हा** :- सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९८२) यवतमाळ जिल्ह्याचा अनुशेष १०५.४१ हजार हेक्टरचा होता तो अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९९४ च्या स्तरावर) १५८ हजार हेक्टरचा झाला. आता जून २०२० च्या राज्यसरासरीवर तो २२१.४५ हजार हेक्टरचा झाला आहे.

**(५) वर्धा जिल्हा** :- सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९८२) वर्धा जिल्ह्याचा अनुशेष ४३.८९ हजार हेक्टरचा होता. तो आता जून २०२० च्या राज्यसरासरीवर तो ४८.८६ हजार हेक्टरचा झाला आहे.

**(६) नागपूर जिल्हा** :- सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९८२) नागपूर जिल्ह्याचा अनुशेष ११.६५ हजार हेक्टरचा होता. तो आता जून २०२० च्या राज्यसरासरीवर ४३.७१ हजार हेक्टरचा झाला आहे.

## *विभागवार अनुशेष स्थिती*

**९.** विभागवार सिंचन अनुशेषाचा विचार केला तर अमरावती, नागपूर, औरंगाबाद हे विभाग अनुशेषाच्या प्रत्येक मोजमापाच्या वेळी अनुशेषातच होते.

**अमरावती महसुली विभागाचा** अनुशेष जून १९८२ मध्ये ४१७ हजार हेक्टरचा होता. तो जून १९९४ मध्ये ७२६ हजार हेक्टरचा झाला. आता जून २०२० च्या राज्यसरासरीवर तो १०६१.७१ हजार हेक्टरचा झालेला आहे. **नागपूर महसुली विभागाचा** अनुशेष जून १९८२ मध्ये ११० हजार हेक्टरचा होता तो जून १९९४ मध्ये १२७ हजार हेक्टरचा झाला होता. तो आता जून २०२० च्या राज्यसरासरीवर १००.२४ हजार हेक्टरचा झाला आहे. **विदर्भाचा** अनुशेष जून १९८२ मध्ये ५२७ हजार हेक्टरचा होता तो जून १९९४ मध्ये ८५३ हजार हेक्टरचा झाला. तो आता जून २०२० च्या राज्यसरासरीवर ११६१.९५ हजार हेक्टरचा झाला आहे. **मराठवाड्याचा** अनुशेष जून १९८२ मध्ये २६० हजार हेक्टरचा होता तो जून १९९४ मध्ये ४०१ हजार हेक्टरचा झाला. आता २०२० च्या सरासरीवर तो ६१७.०१ हजार हेक्टरचा झालेला आहे.

## *प्रत्येक वेळी जिल्हा सरासरीच्या सतत वर असलेले जिल्हे*

**१०.** पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर हे जिल्हे प्रत्येक मोजमापाच्या वेळी राज्य सरासरीच्या वरच होते. म्हणजे कधीही सिंचन अनुशेषात नव्हते. जिल्हावार तपशील पुढीलप्रमाणे :-

**(१) पुणे** : जून १९८२ मध्ये राज्य सरासरी २२.५५ टक्के असतांना पुणे जिल्ह्याने ३०.१८ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. जून १९९४ पर्यंतची राज्य सरासरी ३७.२४ टक्के असतांना या जिल्ह्याने ५२.०५ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. आज आता जून २०२० ची राज्य सरासरी ६५.५९ टक्के असतांना या जिल्ह्याने ८७.०१ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली आहे. त्यामुळे आज हा जिल्हा अतिरिक्त सिंचनक्षमता असलेला जिल्हा आहे.

**(२) सातारा** : जून १९८२ मध्ये राज्य सरासरी २२.५५ टक्के असतांना सातारा जिल्ह्याने ३०.०६ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. जून १९९४ ची राज्य सरासरी ३७.२४ टक्के असतांना या जिल्ह्याने ९४.९४ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. आज आता जून २०२० ची राज्य सरासरी ६५.५९ टक्के असतांना या जिल्ह्याने ९५.५९ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली आहे. त्यामुळे आजही हा जिल्हा पूर्णपणे अतिरिक्त सिंचनक्षमतेचा जिल्हा आहे.

**(३) सांगली** : जून १९८२ मध्ये राज्य सरासरी २२.५५ टक्के असतांना सांगली जिल्ह्याने ३३.०६ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. जून १९९४ पर्यंतची राज्य सरासरी ३७.२४ टक्के असतांना या जिल्ह्याने ७३.८५ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. आज आता जून २०२० ची राज्य सरासरी ६५.५९ टक्के असतांना या जिल्ह्याने १४०.५८ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली आहे. त्यामुळे आज हा जिल्हा पूर्णपणे अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेला जिल्हा आहे.

**(४) सोलापूर** : जून १९८२ मध्ये राज्य सरासरी २२.५५ टक्के असतांना सोलापूर जिल्ह्याने ३०.५६ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. जून १९९४ ची राज्य सरासरी ३७.२४ टक्के असतांना या जिल्ह्याने ३७.६१ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. आज आता जून २०२० ची राज्य सरासरी ६५.५९ टक्के असतांना या जिल्ह्याने ८९.७९ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली आहे. त्यामुळे आज हा जिल्हा पूर्णपणे अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेला जिल्हा आहे.

**(५) कोल्हापूर** : जून १९८२ मध्ये राज्य सरासरी २२.५५ टक्के असतांना कोल्हापूर जिल्ह्याने ६०.८२ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. जून १९९४ पर्यंतची राज्य सरासरी ३७.२४ टक्के असतांना या जिल्ह्याने १५८.७७ टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली होती. आज आता जून २०२० ची राज्य सरासरी ६५.५९ टक्के असतांना या जिल्ह्याने १५७.३० टक्के सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेली आहे. त्यामुळे आज हा जिल्हा पूर्णपणे अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेला जिल्हा आहे.

## *अनुशेषमुक्त होणे म्हणजे काय?*

**११.** अनुशेष संपुष्टात आला म्हणजे काय झाले? याची माहिती घेण्यासाठी उदाहरण म्हणून आपल्याला पुढीलप्रमाणे नमूद करता येईल.

**(१) चंद्रपूर** : या जिल्ह्यामध्ये जून १९८२ च्या अहवालाप्रमाणे राज्य सरासरी २२.५५ टक्के असतांना या जिल्ह्याच्या पदरात १४.६० टक्के सिंचनक्षमता होती व त्यामुळे हा जिल्हा अनुशेषग्रस्त जिल्ह्यांच्या यादीमध्ये होता व त्याचा अनुशेष ५४.९० हजार हेक्टरचा ठरला होता. सन १९९४ च्या मोजमापात राज्य सरासरी ३७.२४ टक्के असतांना या जिल्ह्याच्या पदरात फक्त २०.०७ टक्के सिंचनक्षमता पडलेली होती. त्यामुळे या जिल्ह्याचा अनुशेष १७.१७ हजार हेक्टरचा निश्चित झाला होता. आज सन २०२० च्या मोजमापात राज्य सरासरी ६५.५९ टक्के असतांना या जिल्ह्याची सिंचनक्षमता ८७.६६ टक्के आहे. त्यामुळे या जिल्ह्याचा संपूर्ण अनुशेष नष्ट झाला आहे म्हणजे निरंक आहे असे या अधिकृत आकडेवारीत नमूद आहे. **अद्ययावत राज्य सरासरी पेक्षा जास्त किंवा निदान राज्यसरासरी इतकी सिंचनक्षमता ज्या दिवशी पदरी पडते त्याच दिवशी तो जिल्हा अनुशेषमुक्त होतो.**

## *आर्थिक अनुशेष*

**१२.** एकदा भौतिक अनुशेष (हेक्टरात) निश्चित झाला की, तो अनुशेष दूर करण्यासाठी लागणाऱ्या रकमेला 'आर्थिक अनुशेष' असे संबोधिले जाते. असा अनुशेष काढण्याची जबाबदारीसुद्धा कायद्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविलेली आहे. प्राधिकरणाच्या या अहवालाच्या जोडपत्र २(३) मधील स्तंभ ९ मध्ये अनुशेष दूर करण्याची प्रति हेक्टरी किंमत २,०२,८८६ एवढी पाटबंधारे विभागाने दाखविलेली आहे. सत्यशोधन समितीचा अहवाल दाखल झाला त्यावेळेला ही रक्कम प्रतिहेक्टर १० हजार होती. अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल तयार झाला त्यावेळेला ही रक्कम ५० हजार रुपये प्रति हेक्टरी होती. आता प्राधिकरणाचा २०२०-२१ चा अहवाल सादर करीत असतांना प्रति हेक्टरी अनुशेष दूर करण्यासाठीची रक्कम ही २,०२,८८६ रुपये इतकी झालेली आहे. त्यामुळे आर्थिक अनुशेष कितीतरी पटीने वाढला आहे.

**१३.** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्राचार्य श्री.प्रभाकरराव वैद्य, खासदार

श्री.दादासाहेब गवई व आमदार प्रा.बी.टी.देशमुख अशा आमच्या एका शिष्टमंडळाने 'हेल्पलाईन'च्या वतीने देशाच्या मा.पंतप्रधानांना भेटून शेतकऱ्यांच्या सतत होणाऱ्या आत्महत्त्यांची कैफियत लेखी स्वरूपात सादर केली होती. त्यानंतर मा.पंतप्रधानांनी जुलै २००६ मध्ये प्रत्यक्ष विदर्भाला भेट देऊन पहाणी केली. पुढे मंगळवार, दिनांक १५ ऑगस्ट २००६ रोजी सकाळी भारताचे मा. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग झेंडावंदनानंतर दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून भाषण करीत होते. दूरदर्शनवरून देशभर होत असलेल्या थेट प्रक्षेपणामुळे लक्षावधी नागरिकांना हे थेट भाषण ऐकता येत होते. "**मेरे प्यारे देशवासियो, भाईयो, बहनो और प्यारे बच्चो**" या शब्दाने त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. पहिल्या ५-१० मिनिटात निरनिराळ्या क्षेत्रात भारताने कसा विकास केला आहे व भारत कसा विकास करीत आहे याचे वर्णन केल्यानंतर एकदम त्यांच्या चेहऱ्यावर दुःखमिश्रित गंभीर भाव उमटले व त्यांच्या तोंडून विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांबाबत पुढील उद्‌गार बाहेर पडले :-

"मुझे अहसास है कि देश के कई हिस्सो में हमारे किसान भाई काफी संकट मे है और काफी मेहनत-मशक्कत के बाद भी उन्हें अपनी जमीन से सही कमाई नही हो पा रही है. **जब मै विदर्भ गया तो वहां के किसानों के हालात ने मुझ पर गहरा असर डाला. इन्हीं हालात की वजह से किसान खुदकुशी करने के लिए मजबूर हो रहे है.** हमें सोचना होगा कि हम उनकी दिक्कतों को कैसे दूर करें और उन्हे बेहतर आमदनी कैसे दिलाएं."

**१४.** एवढ्या मोठ्या खंडप्राय भारताच्या मा. पंतप्रधानांनी दिल्लीच्या लाल किल्ल्यावरुन स्वातंत्र्य दिनानिमित्त झेंडावंदनानंतर केलेल्या भाषणामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात फक्त विदर्भाचा उल्लेख केला होता. तो एकदा नव्हे तर दोनदा केलेला होता. मा.पंतप्रधानांनी आपल्या या भाषणात आहे ही स्थिती केवळ सांगितली नाही तर आपत्तीचा उगम कशातून आहे व आपत्ती निवारणार्थ काय उपाययोजना केलेली आहे याबाबत सूचक उद्‌गार काढले. ते शब्दशः पुढील प्रमाणे :-

**"विदर्भ में कर्ज के बोझे से दबे हुए किसानो के बकाया कर्ज के व्याज को माफ कर दिया गया है..... इसके बावजूद मैं मानता हूँ कि किसानो की हालत सुधारने के लिए अभी बहुत कुछ किया जा सकता है खास तौर पर, उन इलाकों में जहां सिंचाई की सुविधाएं नही हैं और खेती बारिश पर निर्भर है."**

**१५.** मा. पंतप्रधानांनी घोषित केलेले उपरोक्त निष्कर्ष हे त्यांनी त्यापूर्वीसुद्धा जाहीररीत्या मांडले होते. "जब मै विदर्भ गया तो वहांके किसानों की हालात ने मुझपर गहरा असर डाला." हा जो त्यांच्या भाषणातील संदर्भ आहे, तो जुलै २००६ मधील त्यांच्या विदर्भ भेटीशी संबंधित आहे. दिनांक १ जुलै २००६ रोजी नागपूर मुक्कामी त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जे अधिकृत वृत्तपत्रीय निवेदन वितरीत करण्यात आले, त्यामध्ये सुद्धा आत्महत्येच्या कारणाविषयी "The causes of the crisis seem to be many. The Primary ones seem to be .... poor irrigation" असे नमूद केलेले आहे. एवढे म्हणूनच ते थांबले नाहीत तर सिंचनाच्या खात्रीलायक सुविधा निर्माण व्हाव्यात म्हणून पॅकेजमधील सहा जिल्ह्यासाठी या कामी २१७७ कोटी रुपयाचा निधी त्यांनी केंद्रशासनातर्फे उपलब्ध करून दिला.

**१६.** देशाच्या मा. पंतप्रधानांनी दिनांक १ जुलै २००६ रोजी नागपूर येथे जे अधिकृत वृत्तपत्रीय निवेदन प्रसारित केले त्यात "We are announcing a series of measures for the 6 affected districts of Vidarbha namely, Amravati, Wardha, Yavatmal, Akola, Washim and Buldhana." असे नमूद करण्यात आले असून त्याच निवेदनात तातडीच्या व दिर्घमुदतीच्या अनेक उपाययोजना त्यांनी घोषित केल्या. दिर्घमुदतीची पहिलीच उपाययोजना त्यामध्ये पुढील प्रमाणे नमूद आहे. :-

"There is a crying demand all around for improving irrigation. We are allocating Rs. 2177 crores from the Central Government for Completion of major, medium and minor irrigation projects in these districts over the next 3 years" (See page 1 and 2 of the Text of the Prime Ministers Statement issued on 1st July 2006 at Nagpur)

**१७.** देशाच्या मा. पंतप्रधानांनी आलेल्या संकटाला तोंड देण्यासाठीची उपाययोजना म्हणून २१७७ कोटी रुपयांचा निधी या सहा जिल्ह्यांसाठी जादाची जलसिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी जाहीर केला. मा. राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे देण्यात येणाऱ्या निधीशी याचा काहीही संबंध नाही, ही गोष्ट राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी सभागृहात पुढील शब्दात नमूद केली :-

"हा निधी तीन वर्षामध्ये उपलब्ध होईल व त्यानुसार तो खर्च केला जाईल. तसेच शासनाकडून इतर वेळी बॅकलॉगसाठी जो निधी दिला जातो तो या निधी व्यतिरिक्त असतो. वेगाने प्रकल्प पूर्ण होण्यासाठी दोन्ही निधी एकत्रित केल्यास प्रकल्प पूर्ण होऊ शकतील. अशा पद्धतीने निर्णय घेण्यात आला आहे." *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन ३ जुलै २००६ पृष्ठ ३टी-२)*

**१८.** प्रथम राज्य शासनाच्या व त्यानंतर केंद्र शासनाच्या पॅकेजमध्ये येणारे सहा जिल्हे हे विकासाच्या बाबतीत सर्वात जास्त मार बसलेले जिल्हे आहेत. अनेक लोक "या जिल्ह्यात सुद्धा आत्महत्त्या झालेल्या आहे मग तेथे पॅकेज का नाही?" असा उथळपणाचा प्रश्न विचारतात, अर्थात पॅकेज मध्ये समाविष्ट असलेल्या जिल्ह्यात महत्तम अनुशेष असलेले जिल्हे आहेत याची त्यांना माहिती नसते. खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनी फक्त सहाच जिल्ह्यांना कां पॅकेज दिले? याचे सभागृहात जोरदार समर्थन केले ते पुढील शब्दात :-

"विदर्भात शेतकऱ्यांचे आत्महत्त्या करण्याचे प्रमाण जास्त आहे ही वस्तुस्थिती आहे. मराठवाडा, खानदेश किंवा अन्य प्रगत जिल्ह्यांमध्ये सुद्धा शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. परंतु विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे प्रमाण जास्त आहे...... **या भागात सिंचनाची सुविधा अतिशय अपुरी आहे. नाही म्हटले तरी चालेल. त्यामुळे विदर्भात केवळ सिंगल क्रॉप घेतले जाते. सिंगल क्रॉपवरुन डबल क्रॉपवर जाण्यासाठी सिंचनाची आवश्यकता आहे.**" असेही त्यांनी सांगितले. *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन ३ जुलै २००६ पृष्ठ ३क्यु-१ व २)*

**१९.** महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी हा जो पुढाकार घेतला त्यामुळे राज्याच्या मंत्रिमंडळाने सुद्धा यासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्याबाबतचा "निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालास मान्यता देण्याबाबत" या विषयावरील शासननिर्णय (शासन निर्णय, क्रमांक - निअस-१०००/प्र.क्र.६०/का.१४५१) महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने दिनांक ५ सप्टेंबर २००१ रोजी निर्गमित केला. या शासननिर्णयातील प्रमुख तीन निर्णय पुढीलप्रमाणे :-

(१) निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालास या शासन निर्णयाद्वारे शासनाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

(२) निर्देशांक व अनुशेष समितीने काढलेला अनुशेष दूर करण्यासाठी संबंधित विभागांनी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**(३) अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करीत असतांना नवीन अनुशेष निर्माण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.**

**२०.** भारतीय संविधानातील कलम ३७१(२) आजही कायम आहे. त्याअंतर्गत अस्तित्वात आलेले वैधानिक विकास मंडळ मात्र उद्‌ध्वस्त करण्यात आलेले आहे. परिणाम असा आहे की, "**१९८२ चा अनुशेष भरून निघाला आहे**" व "**अनुशेष भरून निघाला आहे**" या दोन वाक्यातील फरक न समजणारे सरकारी अधिकारी या कामाचे नेतृत्व करीत आहेत. शेतकरी आत्महत्त्यांचे एक प्रमुख कारण म्हणजे सिंचन सुविधांचा अभाव हे आहे ही गोष्ट आता सर्वमान्य झालेली आहे. अनुशेषग्रस्त जिल्ह्यांचा अनुशेष सतत वाढतच आहे. मात्र अशाही परिस्थितीत फारच निवडक लोकप्रतिनिधी व निवडक पत्रकार या प्रश्नाचा पाठपुरावा करतात असे दिसून येते. दैनिक लोकसत्ता आणि लोकसत्ता नागपूर आवृत्तीचे निवासी संपादक श्री.देवेंद्र गावंडे व अमरावती विभागाचे प्रतिनिधी श्री.मोहन अटाळकर यांनी या संदर्भात सुरू ठेवलेल्या लोक जागृतीचे कार्य निश्चितच स्पृहणीय आहे.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 20.05.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.06.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,.......................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................